आजचा शुभ विचार

स्वप्ने पाहणाऱ्यांना अडथळे आव्हानांचे संकेत म्हणून दिसतात, निराशेचे नाही. स्वप्नांच्या पीछ्याने जाताना, तुमच्या मनाची शक्ती वाढते.

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

चला तर आपल्या सेवेत आम्ही आहोत

जेव्हा गरज असेल प्रसिद्धीची किंवा आपल्या व्यवसायाला चालना देण्याची

दैनिक स्वराज्यदूत

आपल्या पाठीशी आहे

आम्ही देत आहोत आपल्याला जलद गतीने प्रसिद्धीसाठी

छापील वृत्तपत्र आणि इ पेपर मध्ये जाहिरातीचा पर्याय

* फक्त २९९९ रुपयात ३० दिवस आपली कोणतीही जाहिरात प्रसिद्ध केली जाईल.

संपर्क -मो. ८४४६६ ७३६७७

स्वराज्यदूत NEWS MEDIA CHANNEL

वेबसाईट ला भेट द्या www.swarajyadoot.com

मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-69 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thursday 17 July 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ६९ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ गुरुवार, दि. १७ जुलै २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये

# उद्धव ठाकरेंना सत्तेत येण्याचा स्कोप', मुख्यमंत्री फडणवीसांची जाहीर ऑफर

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------------



विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या आमदारकीचा शेवटचा दिवस होता. त्यांच्या निरोप समारंभाच्या निमित्ताने बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना जाहीर ऑफर दिली. त्या आधी या दोन्ही नेत्यांची सभागृहाबाहेरही भेट झाली होती. आधी सभागृहाच्या परिसरात उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीसांची भेट झाली आणि नंतर सभागृहात फडणवीसांनी केलेल्या एका जाहीर वक्तव्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना थेट सभागृहात ऑफर दिली आहे. आम्हाला विरोधी पक्षात जाण्याचा स्कोप २०२९ पर्यंत नाही, मात्र तुम्हाला मात्र इकडे येण्याचा स्कोप असल्याचं देवेंद्र फडणवीस म्हणाले. फडणवीसांच्या या वक्तव्याचे आता तर्कवितर्क लढवले जात आहेत.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उद्धवजी आता २०२९ पर्यंत काही करायचं नाही. आम्हाला तिकडे यायचा स्कोप उरला नाही. मात्र तुम्हाला इकडे यायचा स्कोप आहे. त्यावर वेगळ्या पद्धतीने विचार करता येईल. आपण वेगळ्या पद्धतीने बोलू.

वेंद्र फडणवीस म्हणाले की, "अंबादास दानवे यांचा कार्यकाळ संपत आला आहे. अनिल परब तुम्ही आता तयारी करा. दानवे वेगवेगळे योग जुळवून आणतात. हिंदुत्ववाची कडवट भूमिका घेणारा कार्यकर्ता म्हणजे दानवे आहेत. भोंग्यानविरोधात त्यांनी अनेक निवेदनं दिली. ते कट्टर सावरकरवादी आहेत. जरी ते बंटी पाटील यांच्या बाजूला ते बसले असतील तरीही ते सावरकरांचे भक्त आहेत."

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, " अंबादास दानवे हे मूळचे भाजपच्या मुशीत घडलेले कार्यकर्ते. हिंदुत्ववाची कडवट भूमिका घेणारे आणि कट्टर सावरकरवादी कार्यकर्ते म्हणजे दानवे. पण जागावाटपात विधानपरिषदेची जागा शिवसेनेला गेली. मग दानवेंना शिवसेनेत जावं लागलं."

मुख्यमंत्री फडणवीसांच्या भाषणाचा हाच संदर्भ घेऊन उद्धव ठाकरे म्हणाले की, " भाजपच्या आणि संघाच्या मुशीत घडलेला असा अंबादास दानवे हा कार्यकर्ता आम्हाला दिला याबद्दल मी मुख्यमंत्री फडणवीसांचे आभार मानतो. मात्र त्यांनी माझ्याकडून घेतलेल्या नेत्यांबद्दल मुख्यमंत्री माझे आभार मानू शकतील की नाही याबद्दल शंका आहे."

# तेलंगणा सीमाभागातील १४ गावं महाराष्ट्रात सामील होणार

## महाराष्ट्र व तेलंगणा सीमाभागातील ही गावं चंद्रपूर जिल्ह्यात समाविष्ट करण्याच्या हालचाली सुरु

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------------



दशकांपासून सुरू असलेला आंतरराज्य सीमा प्रश्न सोडवण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी राज्य अधिकाऱ्यांना चंद्रपूरच्या जिवती तहसीलमधील १४ गावाना महाराष्ट्र राज्याच्या हद्दीत समाविष्ट करण्यासाठी निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र व तेलंगणा सीमाभागातील १४ गावांचा प्रश्न सुटला आहे. ही सर्व गावं महाराष्ट्रात सामील करून घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. त्यानुसार सीमाभागातील ही गावे चंद्रपूर जिल्ह्यात समाविष्ट करण्याच्या हालचालीला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र राज्य सरकारच्या या मोठ्या निर्णयामुळे संबधित गावातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे. ही सर्व गावं राजुरा आणि जिवती तालुक्यात सामील होतील. त्यानंतर या गावांना सर्व ग्रामीण योजनांचा लाभ देण्यात येणार आहे.

आज विधानभवनात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात या संबंधित बैठक पार पडली. या बैठकीला आमदार देवराज भोंगळेसह जिवती तालुक्यातील १४ गावातील ग्रामस्थ, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांची उपस्थिती होती. त्यानुसार परमडोली, परमडोली तांडा, कोठा (बुद्रुक आणि खुद्रुक), लेंडीगुडा, मुकादमगुडा, लेंगीजाळा, महाराजगुडा, अंतापूर, इंदिरानगर, शंकरलोधी, पद्मावती, भोलापठार, येसापूर, परसगुडा या या १४ गावांना महाराष्ट्रात स्थान मिळणार आहे.

याबाबत बोलताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, ही १४ गावं महाराष्ट्राचीच आहेत. या गावांचा महसुली रेकार्ड देखील महाराष्ट्राचा आहे, मात्र त्या राज्यात व्यवहार होते. आता गावठाण महाराष्ट्रात ठेवण्याची कारवाई सुरु केली आहे. या गावांतील १०० % नागरिक हे महाराष्ट्रातील मतदार आहेत. काही काळापूर्वी दोन्ही भागांचा व्यवहार हा सारखाच होता, मात्र आता ही गावे राज्यात समाविष्ट करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. प्रक्रिया झाल्यानंतर लवकरच याची अधिकृत घोषणा होईल."

उद्योगमंत्री उदय सामंत यांनीदेखील तेलंगणा सीमेवरील १४ गावं महाराष्ट्रात येत असल्याच्या बातमीची पुष्टी केली. ते म्हणाले, "सीमावादामुळे मराठी माणसाच्या जगण्यात अडचणी येऊ नये, हीच सरकारची भूमिका आहे. बेळगावच्या प्रशासनानं जागा दिली तर मराठी अध्यासन विभाग उभा करू, तसे प्रयत्न देखील आम्ही करणार आहोत आणि कर्नाटक सरकारसोबत बोलणार आहोत".

# काँग्रेसला पुण्यात मोठा धक्का

## संजय जगताप भाजपमध्ये दाखल, पुरंदर हवेलीत राजकीय समीकरणं बदलणार!

अभिजित कुलकर्णी
पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------------



काँग्रेसचे माजी आमदार संजय जगताप यांनी आज भाजपमध्ये अधिकृतपणे प्रवेश केला. भाजपचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत सासवड येथे हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. आगामी निवडणुकांपूर्वी काँग्रेसला हा मोठा धक्का मानला जात आहे, कारण यामुळे पुरंदर हवेलीतील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे.

गेल्या काही दिवसांपासून संजय जगताप भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा होती. सासवड आणि जेजुरी येथील काँग्रेसच्या माजी नगरसेवकांनी जगताप यांना भेटून भाजपमध्ये प्रवेश करण्याची मागणी केली होती, त्यानंतर आज हा पक्षप्रवेश निश्चित झाला.

पक्षप्रवेशानंतर बोलताना संजय जगताप यांनी कार्यक्रमाला उशीर झाल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. ते म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व आणि भाजपची साथ आपल्याला लाभली आहे. "जिथे विकास आहे, तिथे राजकारण नाही. इथे कोणत्याही शेतकऱ्याच्या डोक्यावर पाय देऊन विकास होत नाही, इथे विकास होतो. या विचारामुळेच मी भाजपमध्ये आलो आहे," असे त्यांनी नमूद केले. भाजपचा कार्यकर्ता म्हणून आपण आज प्रवेश केल्याचे त्यांनी सांगितले.

आज ३ हजार प्रवेश करायचे होते, पण यादी कमी करून ३७८ प्रवेश झाले आहेत, असे जगताप यांनी सांगितले. ते म्हणाले, "फक्त संजय जगताप प्रवेश करत नाहीत, तर प्रत्येक कार्यकर्ता या ठिकाणी प्रवेश करत आहे." त्यांनी आपल्या स्वभावात दोष असल्याचे सांगत आपण कधीच वेळेवर येत नाही, अशी कबुली दिली.

पुरंदर तालुक्यातील पाणीप्रश्न आणि विमानतळाचा मोठा प्रश्न प्रलंबित असल्याचे त्यांनी सांगितले. "विमानतळ पुरंदर तालुक्यातच होणार आणि योग्य ठिकाणी होणार, असा मी तुम्हाला शब्द देतो," असे आश्वासन त्यांनी दिले. कोणताही प्रकल्प शेतकऱ्यांच्या डोक्यावर पाय देऊन होत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाने सर्वसामान्यांच्या खात्यात पैसे देण्याचे काम केले आहे. सामाजिक समरसतेचे विचार आपल्याला भावले, म्हणूनच आपण पक्षप्रवेश करत असल्याचे त्यांनी सांगितले. "एखाद्याला पक्षात घेताना खूप अडचणी येतात, पण तुम्ही मला सामावून घेतले," असे म्हणत त्यांनी आभार मानले.

आगामी पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि पुणे महानगरपालिका निवडणुकीत आपल्या कुठल्याही कार्यकर्त्यांची 'पाठ मातीला लागणार नाही', असा विश्वास त्यांनी दिला. "येणाऱ्या काळात आम्ही भाजपचा प्रचार आणि प्रसार करू. जी जबाबदारी द्याल, ती तळमळीने शेवटपर्यंत पार पाडण्याचे काम करेन," असे जगताप म्हणाले. तसेच, "येणाऱ्या काळात मी माझ्या सर्व कार्यकर्त्यांना, पुरंदर हवेलीच्या जनतेला आणि भारतीय जनता पक्षाच्या प्रत्येक परिवाराला सांगू इच्छितो की, कोणत्याही अन्यायाला आपण ठोसपणे आणि ताकदीने उभे राहण्याचे काम करू. संजय जगताप प्रत्येक भारतीय जनता पक्षाच्या परिवाराच्या मागे राहील, प्रत्येक शेतकऱ्याच्या मागे राहील, विकासाच्या बाबतीत कोणालाही राजकारण करू देणार नाही," असेही त्यांनी म्हटले. मागील दोन वर्षांत 'साडीने आमच्या पुरंदरला गुंडाळून टाकले,' असे म्हणत त्यांनी नाव न घेता विजय शिवतारे यांना टोला लगावला.

महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!



महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये

कौतुक तुमच्या कार्याचे

उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449

शतायुषी हो बाळा..

दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

सम्पादकीय

# बिहारमधील मतदार यादीची सफाई

बिहार विधानसभेची २४३ मतदारसंघांसाठी येत्या ऑक्टोबरमध्ये किंवा नोव्हेंबरमध्ये निवडणूक होईल. पण त्यापूर्वीच जोरदार वाद सुरू झाला आहे आणि तो आहे मतदार याद्यांच्या पुनर्निरीक्षणाचा. बिहार मतदार याद्यांचे पुनर्निरीक्षण करण्यास निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांकडून सुरुवात होणार आहे आणि तत्पूर्वीच काँग्रेस, राष्ट्रीय जनता दलाचे तेजस्वी यादव आणि काही विरोधी पक्षांनी घेरण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या मते, बिहार मतदार याद्यांचे पुनर्निरीक्षण करण्यास एवढी थोडी मुदत देण्यामागे आणि विविध निकष पुढे आणण्यामागे तसेच बहुसंख्य मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्याचा भाजपचा डाव आहे. यात राजकारण तर आहेच. पण राहुल गांधी असोत किंवा तेजस्वी यादव असोत, यांना केवळ आपले राजकीय हेतू साध्य करायचे आहेत.

यापूर्वी बिहार मतदार याद्यांच्या पुनर्निरीक्षणातून काही धक्कादायक तथ्ये समोर आली. त्यांना सामोरे जाण्याऐवजी विरोधी पक्ष केवळ नसते मुद्दे उपस्थित करत आहेत आणि निवडणूक आयोगाचा वेळ वाया घालवत आहे, असा आरोप भाजपने केला, तर संतापण्याचे कारण नाही. बातमी अशी आहे की, बिहारमधील मतदारांमध्ये नेपाळ, म्यानमार आणि बांगलादेशीयांची नावे मोठ्या प्रमाणात आढळली आहेत. आयोगानेच हा खुलासा केला आहे. त्यामुळे विरोधी पक्षांना याबाबत आदळआपट करण्याचे काहीच कारण नाही.

त्यामुळे योग्य तपासणीनंतर आता या अनवॉन्टेड मतदारांना मतदार यादीतून काढल्यानंतरच अंतिम यादी ३० सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केली जाईल, असे आयोगाच्या वेबसाईटवर म्हटले आहे. त्यामुळे विरोधकांचे धाबे दणाणले आहेत, कारण त्यांचा फेक नरेटिव्हचा डाव अंगलट आला तसा हाही डाव त्यांच्या अंगलट येणार आहे हे निश्चित आहे. कारण आयोगावर आता पक्षपाती आरोप लावता येत नाही. कारण आयोगाचा साराच कारभार स्वच्छ आणि पारदर्शक आहे. त्यामुळे विरोधी पक्षांची विशेषतः राहुल गांधी यांची पंचाईत झाली आहे. या आधी २००३ साली अशी प्रक्रिया सुरू झाली होती. त्यानंतर आता २०२६ मध्ये ही प्रक्रिया पुन्हा सुरू झाली आहे. मधल्या काळात बरेच पाणी वाहून गेले. मतदानाचा हक्क हा लोकशाहीचा आत्माच. हा अधिकार केवळ देशाच्या नागरिकांना असतो. मात्र बिहारसारख्या राज्यात बांगला घुसखोरांची नावे आढळून आल्याने आणि त्यात म्यानमार तसेच नेपाळी घुसखोर सापडल्याने खळबळ उडणे साहजिकच होते. निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या मतदार याद्यांच्या तपासणीअंतर्गत ही गंभीर बाब उघड झाल्याने विरोधी पक्षांचे पितळ उघडे पडले आणि त्यांचा थयथयाट सुरू झाला आहे. मोठ्या संख्येने बांगलादेशी आणि नेपाळी तसेच म्यानमारवासीयांनी मतदार याद्यात घुसखोरी केल्याचे उघड झाले आहे पण त्यापेक्षाही धक्कादायक बाब म्हणजे त्यांनी आधारकार्ड, रेशनकार्ड देखील वापरल्याचे उघड झाले आहे. राजकीय पक्षानींच त्यांना या आधार कार्डचे वाटप केले असणार! अगदी मुंबईच्या वांद्र्यातल्या बेहरामपाड्यात कित्येक मतदारांना आणून बसवले होते आणि त्यांना सर्व प्रकारची मदत करण्यात आली होती आणि त्यात आपले राजकीय पक्षच आघाडीवर होते. त्यातलाच हा प्रकार आहे.

भारत हा लोकशाहीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. पण या लोकशाहीप्रधान देशात लोकशाहीच्या मूलभूत आधारस्तंभांना पोखरले जात आहे याचे विदारक वास्तव या प्रकाराने समोर आले आहे. आधार कार्ड हा कोणत्याही नागरिकाच्या शुचितेचा पुरावा नाही, असे आयोगाने सर्वोच्च न्यायालयात स्पष्ट सांगितले आहे. त्याचेच प्रत्यंतर आधार कार्डचे कुणालाही आणि कसेही वाटप केल्याने आले आहे. काँग्रेसच्या काळात आधार कार्डचे वाटप करण्यात आले आणि त्यावेळी त्याचा खूप गाजावाजा करण्यात आला होता. पण, त्यामुळे काहीही साध्य झाले नाही. केवळ बोगस नागरिकांची नोंद आधार कार्डमुळे झाली, असे आरोप तेव्हाही झाले होते.

तेव्हा आधार कार्डवर कितपत विश्वास ठेवावा असा प्रश्न निर्माण झाला होता आणि आता त्याला बळ मिळाले आहे. मतदार यादी व्यवस्थित असणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी असते आणि त्यातच घोळ झाला तर त्या लोकशाही प्रक्रियेला काही अर्थ उरत नाही, त्यामुळे बनावट मतदान रोखणे हाच कोणत्याही मतदार यादीचा मुख्य उद्देश असतो. तोच जर गैरलागू ठरला तर पुढील प्रक्रियेला काही अर्थ उरत नाही. देशाची सुरक्षा आणि सार्वभौमत्वाला आव्हान दिले गेले, तर ते कोणताही देश ते मान्य करणार नाही. पण काँग्रेससह काही विरोधी पक्षांच्या भूमिकांमुळे मतदान प्रक्रियेतच बाधा येत आहे. बिहार निवडणुकीत आधार कार्ड गृहीत धरण्यात येत नाही यावरच तेजस्वी यादव यांनी आक्षेप घेतला आहे. पण त्यांचा विरोध अगदी समजण्यासारखा आहे.

अमेरिकेतील मतदान प्रक्रिया बरीच किचकट आहे; पण ती सुव्यवस्थित आहे, तसे भारतात नाही. प्रचंड मोठी लोकसंख्या आणि काही अब्ज मतदारांची यादी यावरून प्रत्येक पात्र मतदाराला मतदानाचा हक्क देणे ही आयोगाची अवघड जबाबदारी आहे. त्या सर्वांवर मात करून आयोग मतदान व्यवस्थित पार पाडण्याचे काम करत असतो पण सीमावर्ती राज्ये अशी आहेत, की ज्यात असे बोगस मतदार आढळतातच.'

त्यांना हुडकून काढून त्यांना मतदारांच्या यादीतून खड्यासारखे वेचून बाजूला काढण्याचे काम आयोग करत असेल तर त्याला आव्हान देणे आणि त्यात अडथळे आणणे कितपत योग्य आहे? सत्ताधारी पक्ष असो की विरोधी पक्ष, दोघांनीही देश कोणत्याही निवडणुकीपेक्षा मोठा आहे आणि निवडणुकीतील जय पराजयापेक्षा देशाचे सार्वभौमत्व आणि देशाची सुरक्षा सर्वात महत्त्वाची आहे हे लक्षात ठेवून वागायला हवे. याचे भान प्रत्येकाला असलेच पाहिजे. बिहारमध्ये निवडणूक आयोगाने मतदार याद्यांचे पुनर्निरीक्षण सुरू केले आहे आणि आताच विरोधी सूर उमटू लागले आहेत. पण प्रत्येक पात्र उमेदवाराला मतदानाचा हक्क मिळाला पाहिजे, त्याचबरोबर काही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता आयोगाने घेतली पाहिजे. मतदार यादीत घुसखोरांची नावे येता कामा नयेत यासाठी प्रयत्न केले पाहिजेत आणि त्यासाठी त्याग करायला हवा. केवळ काही मतदारांना घुसडले म्हणून एखाद्या निवडणुकीत विजय मिळेल; पण त्यामुळे देशाचे प्रचंड नुकसान होईल याकडे दुर्लक्ष करता कामा नये.

# पर्यटकचा इतर सहली सोबतच डार्क टुरिझमकडे जास्त ओढ

देश स्वतंत्र करण्यासाठी अनेक क्रांतिकारक,शुरवीर योध्दा यांनी आपले प्राणपणाला लावुन देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.सोबतच इंग्रजांचे अत्याचार सुध्दा सहन केले.अशा अनेक स्वतंत्र पुर्वकाळातील गाथा, स्मारके देशात आहेत ती आपण कदापि विसरू शकत नाही आणि विसरणार सुध्दा नाही.यात जालियनवाला बाग, अंदमान कारागृह इत्यादीसह अनेक स्थळे आहेत त्यांना पर्यटक भेट देत असतात.यानंतर स्वातंत्र्योत्तर काळातील भोपाळ गॅस दुर्घटना स्मारक, पंजाबमधील ऑपरेशन ब्लू स्टार राबविण्यात आलेली जागा कारगिलमधील युध्द स्मारके, मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ साली झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील ठिकाणे असे अनेक स्वतंत्र पुर्वकाळातील व स्वतंत्र काळातील ऐतिहासिक ठिकाणे पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र असतातच.परंतु गेल्या काही वर्षांतल्या भयावह दुर्घटना किंवा हिंसाचाराच्या घटनांच्या स्थळांनाही पर्यटक आवर्जून भेट देत असल्याचे दिसून येते आणि द्यायलाच पाहिजे.परंतु सध्याच्या परिस्थितीत वाढत्या दुर्घटनांचा जनु काय ओघ लागला की काय असे दिसून येते. त्यामुळे या दुर्घटना ग्रस्त ठीकाणांना आजचा पर्यटक भेट देणे जास्त पसंत करतो.कारण दुर्घटना कशी झाली असावी?का झाली असावी? अशा अनेक आश्चर्यकारक घटना दिसून येतात.अशा अनेक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी किंवा माहिती गोळा करण्यासाठी किंवा कोणी विचारले तर सांगता यावे की आम्ही त्या भयावह दुर्घटनांचे ठिकाणे आम्ही पाहिल्या.म्हणजेच दु:खद किंवा शोकांतिका ठिकाणांना भेट देणे यालाच डार्क टुरिझम म्हणतात.या डार्क टुरिझमकडे सध्याच्या परिस्थितीत पर्यटकांचा वाढता शौक मोठ्या प्रमाणात दिसून येते.यामध्ये अनेक ठिकाणे आहेत अहमदाबाद विमान दुर्घटनाग्रस्त इमारत, मुंब्र्यातील अरूंद रेल्वे रूळ, केरळमधील वायनाडमधील दरड कोसळून २३० हून अधिक जणांचा मृत्यू झाला तो परिसर, चेंगराचेंगरीचे ठिकाणे अशाप्रकारे अनेक दुर्घटनास्थळे, दहशतवादी हल्ल्यांच्या ठिकाणांचे "डार्क टुरिझम"करण्याकडे कल वाढत चालला असून अहमदाबाद त्याचे ताजे उदाहरण आहे.या सहली फक्त मनोरंजनासाठी नसून भावनिक आणि शैक्षणिक हेतूही त्यामागे असतो.अशाप्रकारच्या डार्क टुरिझममध्ये दहा टक्क्यांनी वाढ झाल्याचे सांगितले जाते.मुख्यत्वेकरून डार्क टुरिझम म्हणजे मानवी मृत्यू, संहार, युध्द, दुर्घटना, यांच्याशी संबंधित ठिकाणी भेट देणे किंवा तेथील पर्यटन करणे, यालाच "डार्क टुरिझम"असे म्हटले जाते.सांगायचे तात्पर्य म्हणजे पर्यटक मनोरंजनात्मक ठिकाण व स्वतंत्रपुर्व काळातील स्मारकांना भेट देतातच सोबत दुर्घटनाग्रस्त(डार्क टुरिझम) भागांना सुध्दा भेट देतात.त्यामुळे पर्यटकांचा ओघ डार्क टुरिझम वाढल्याचे दिसून येते.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर

# सौ शालिनी भास्कर नारायण गुंजाळ या दांपत्याच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे मोफत वाटप

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------

दि.१५ जुलै २०२५ वार-मंगळवार रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मंडाणे केंद्र-बल्हाणे येथे मुंबई (विरखेल) येथील दानशूर व्यक्तिमत्व श्री.भास्कर नारायण गुंजाळ सौ.शीलाताई भास्कर गुंजाळ श्री.प्रसाद भास्कर गुंजाळ व सौ. मेघा प्रसाद गुंजाळ या सर्व दात्यांच्या संकल्पातून शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी. विद्यार्थ्यांना शाळेविषयी आवड निर्माण व्हावी.म्हणून शाळेतील गरजू सर्व विद्यार्थ्यांना मोफत शालेय दप्तर,



पाटी, वह्या, पेन पेन्सिल वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्याप्रसंगी मंडाणे ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, शा. व्य. समिती अध्यक्ष, अंगणवाडीच्या सेविका, मदतनीस, दाखलपात्र विद्यार्थ्यांचे पालक गावातील महिला भगिनी पुरुष सर्व मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेतील श्री. नरेश अहिरराव सर यांनी केले. प्रास्ताविकानंतर सरस्वती मातेचे प्रतिमा पूजन सन्माननीय श्री.भास्कर नारायण गुंजाळ यांनी सपत्नीक केले. कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचा सन्मान शाळेचे मुख्या.श्री.शांताराम पवार यांच्या वतीने करण्यात आला. त्यानंतर गुंजाळ परिवार व सर्व मान्यवरांच्या हस्ते शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत शालेय दप्तर,वह्या,पेन,पेन्सिल सर्व साहित्य वाटप करण्यात आले.समारोप शाळेतील उपशिक्षक श्री नितीन वेंदे सर यांनी केले.

# बागलाण तालुक्यातील तरुणाची पुण्यात हत्या; आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी; निषेधार्थ मूक मोर्चा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------------

ठेंगोडा येथील युवकाच्या पुण्यातील धनकवडी परिसरात झालेल्या खूनाच्या निषेधार्थ आज गावातील तरुण बांधव व नागरिकांनी एकत्र येत घडलेल्या घटनेचा निषेध करत व कॅण्डल मार्च व निषेध मूक मोर्चा काढला. खूनाच्या आरोपातील अटक केलेल्या संशयीताला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली.

पुणे शहरात ग्रामीण भागातील मुलं, मुली, शिक्षणासाठी जातात. असाच ठेंगोडा येथील एक तरुण युवक अशोक साबळे यांचा मुलगा निखिल साबळे पंधरा दिवसापूर्वी पुणे शहरात मामा दिनेश बागुल यांच्याकडे कुलर, एसी, रिपेरिंग शिक्षणासाठी गेला होता. परंतु पुण्यात कुठलेही कारण नसताना शुक्रवारी (ता ११) रात्री दहा वाजेला येथील गुंडांनी तीक्ष्ण धारदार




हत्यारांनी सपासप वार करून गंभीर जखमी केले. त्याला उपचारासाठी रुग्णालयात नेले असताना उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेच्या निषेधार्थ आज ठेंगोड्यात मूक मोर्चा काढण्यात आला. गरीब कुटुंबातील तरुण करता मुलगा अशा घटनेत गेल्याने गावात तीव्र संतापाची लाट उसळली. पोलीस प्रशासन व शासन यावर लक्ष वेधण्यासाठी ठेंगोडा गावातील व परिसरातील तरुण युवक महिला यांनी सायंकाळी कॅन्डल मार्च काढत मूक मोर्चा काढला. पुण्यातील कायदा सुव्यवस्था बाबत पोलीस प्रशासन काय उपाययोजना करणार, गुंडांचा काय बंदोबस्त करणार असा प्रश्न उपस्थित करीत निखिल साबळे व त्याच्या कुटुंबाला न्याय देण्याची मागणी यावेळी भाजपा किसान मोर्चा महामंत्री श्री बिंदू शेठ शर्मा यांनी केली. तसेच सामाजिक कार्यकर्ता श्री नंदलाल अहिरे यांनी निखिल साबळे च्या खुनाचा निषेध व्यक्त केला.

# लायन्स क्लब तर्फे भूषण निकम यांचा 'एक्सलन्स अवॉर्ड' देऊन गौरव; कृषी उद्योजकता विस्तार क्षेत्रातून पुरस्कार

किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदूत
---------------------

नाशिक जिल्ह्यातील प्रसिद्ध कृषी उद्योजक, बिजनेस कोच, मोटिवेशनल ट्रेनर आणि कृषीभूषण महाराष्ट्र एफपीओ स्टार्टअप फेडरेशनचे चेअरमन भूषण निकम यांना लायन्स क्लब ऑफ पिंपळगाव बसवंत यांच्या वतीने "एक्सपोर्टर अँड ग्रोवर" विभागात 'एक्सलन्स अवॉर्ड' देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार वितरण सोहळा नाशिक येथील देवी इंटरनॅशनल हॉटेल येथे पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. या कार्यक्रमाला राजेंद्र कोठावदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याशिवाय *लायन्स क्लबचे अध्यक्ष संदीप हिरे, सचिव रविराज पाटील, महेंद्र शेवाळे, ज्ञानेश्वर लांबे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

या पुरस्कार सोहळ्यात शेतकरी, डॉक्टर्स आणि चार्टर्ड अकाउंटंट अशा




विविध विभागांतून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला.

भूषण निकम यांनी कृषी पदवीनंतर गेली १७ वर्षे कृषी उद्योजकतेच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण कार्य केले आहे. त्यांनी माती-पाणी परीक्षण, शेतमाल डीहायड्रेशन, ट्रेनिंग सेंटर, शेतमाल निर्यात, प्रकाशन, ट्रेडिंग अशा विविध क्षेत्रांत स्वतःचे व्यवसाय उभारले. केवळ स्वतःपुरते मर्यादित न राहता, त्यांनी राज्यभरात ६०० हून अधिक शेतकरी उत्पादक कंपन्यांची निर्मिती, हजारो कृषी उद्योजक घडवणे, तसेच ३ लाखांपेक्षा अधिक शेतकरी, युवक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून एक व्यापक कृषी चळवळ उभी केली.

या कार्यक्रमात भूषण निकम यांनी "कृषी उद्योजकता व आरोग्य" या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. सेंद्रिय शेतमाल खाणे ही काळाची गरज आहे, असे सांगून त्यांनी लायन्स क्लबच्या वतीने भविष्यात 'सेंद्रिय बाजार' या उपक्रमाच्या आयोजनाबाबत सकारात्मक मदत करण्याचे आश्वासन दिले.

तसेच, " आपण आपल्या लहान मुलांना जंक फूड आणि पॅकिंग फूड देतो, त्याचे गंभीर परिणाम आरोग्यावर होतात. त्यामुळे महिलांनी आपल्या घरातील आहारावर लक्ष द्यावे, कारण आरोग्य असेल तरच आपले अस्तित्व टिकू शकते,"असे भावनिक आवाहनही त्यांनी केले.

त्यांच्या कार्याची दखल घेत आजवर ६० हून अधिक राज्य व राष्ट्रीय पुरस्कार, १७ पुस्तके, १२०० लेख, शेकडो रेडिओ-टीव्ही कार्यक्रम व वेबिनार आणि विविध सेमिनारद्वारे केलेले मार्गदर्शन त्यांचे कार्य क्षेत्र विस्तृत आहे. नुकतेच राज्यपालांच्या हस्ते कृषी पुरस्कार आणि मा. अजितदादा पवार यांच्या हस्ते त्यांच्या 'कॉर्पोरेट शेतकरी' या पुस्तकाचे प्रकाशन झाल्याने त्यांच्या कार्यास मान्यता मिळाली आहे.

या कार्यक्रमात भूषण निकम यांच्या कन्या कु. आराध्या निकम हिने लिहिलेल्या 'Becoming A Smart Student' या पुस्तकाचेही अभिनंदन करण्यात आले. अवघ्या वयात लेखनप्रवास सुरू केल्याबद्दल तिचे विशेष कौतुक करण्यात आले.

हा पुरस्कार केवळ भूषण निकम यांचेच नव्हे, तर संपूर्ण कृषी उद्योजक क्षेत्राचे यश आहे, असे गौरवोद्गार यावेळी उपस्थित मान्यवरांनी काढले.

# हरितकुंभ वृक्षारोपण अंतर्गत नांदगाव शहरात वृक्षारोपण

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------------

आज हरितकुंभ अंतर्गत विशेष वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली.नांदगाव शहरात देखील नांदगाव नगरपरिषदेच्या वतीने मुख्याधिकारी तथा प्रशासक शामकांत जाधव यांच्या उपस्थितीत शहरातील नवीन जलशुद्धीकरण केंद्र जवळील डोंगरावर बांबू, पिंपळ, चिंच, वड, कडुनिंब, शिसम या सारख्या देशी प्रजातीच्या ५०० वृक्षांची




लागवड करण्यात आली. याप्रसंगी नगरपरिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, बचत गटातील महिला, व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होते. उत्साहात वृक्षारोपण पार पडले. तसेच यावेळी सर्व वृक्ष जगविण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार करण्यात आला.

# झुडपी जंगलात 'रोहिंग्यांचे' बेकायदेशीर अतिक्रमण!
## ग्रामस्थांचे जीवन अशांत; जिल्हाधिकाऱ्यांकडे तिव्र तक्रार

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-------------------------

तिरोडा तालुक्यातील काचेवानी गावशिवारातील झुडपी जंगलात रोहिंग्या फकीर समाजाने केलेल्या बेकायदेशीर अतिक्रमणामुळे संपूर्ण काचेवानी गावात अस्वस्थता आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी याविरोधात अखेर आवाज उठवत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून त्वरित कारवाईची मागणी केली आहे.

गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, १९९१-९२ मध्ये केवळ तीन घरांची असलेली ही वसाहत आज तब्बल ४० ते ५० झोपड्यांमध्ये रूपांतरित झाली आहे. गावाच्या झुडपी जंगल विभागातील गट क्रमांक ६७२, ६७३ व ६७६ मध्ये हे अतिक्रमण वाढले असून, परवानगीशिवाय उभारण्यात आलेली मस्जिद देखील त्या परिसरात अस्तित्वात असल्याचा धक्कादायक खुलासा ग्रामस्थांनी केला आहे.

गुन्हेगारीचे अड्डे तयार!



अतिक्रमण करणारे हे लोक गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून गावात मांस वाळवणे, घाण करणे, चोरी, भांडण, युवकांना नशेच्या आहारी लावणे, खोटे गुन्हे दाखल करणे, गांजाची विक्री अशा धोकादायक कृत्यात गुंतले आहेत. परिणामी, गावकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले असून महिलांची व लहान मुलांची सुरक्षितता देखील धोक्यात आली आहे.

पर्यावरण व ग्रामविकास धोक्यात!

या अतिक्रमित वसाहतीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असून, या जागेवर वनविभागाचे विश्रामगृह उभारण्याचा प्रस्ताव असतानाही ही गुन्हेगारी वसाहत गावाच्या विकासाच्या आड येत आहे.

ग्रामस्थांची जोरदार मागणी!

ग्रामस्थांनी या संपूर्ण बेकायदेशीर वसाहतीची उच्चस्तरीय चौकशी करून ती जागा शासनाच्या ताब्यात घेण्याची आणि ती ग्रामविकासाच्या दृष्टीने वापरण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. याशिवाय, या वसाहतीतील लोक कोणत्याही एकजातीत मोडत नाहीत व त्यांच्या पार्श्वभूमीबाबत गंभीर शंका आहेत, असेही निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनासमोर मोठे आव्हान

ही तक्रार जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, वनविभाग अधिकारी, पोलीस निरीक्षक तसेच स्थानिक आमदार यांच्याकडेही पाठविण्यात आली असून, आता प्रशासनाच्या भूमिकेकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# २०२३ चा पीक विमा तात्काळ द्या, बँकांना पीक कर्ज वाटपाचे आदेश द्या!
## आमदार जितेश अंतापूरकरांची विधानसभेत मागणी

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
--------------------------

देगलूर बिलोली विधानसभेचे आमदार जितेश अंतापूरकर यांनी बुधवारी (१६ जुलै २०२५) विधानसभेत शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर आवाज उचलला. २०23 साली ऑफलाईन पद्धतीने पीक विमा भरलेल्या १५५६ शेतकऱ्यांना अद्यापही विमा मिळाला नसल्याने तो तात्काळ देण्याची मागणी त्यांनी केली. याचबरोबर, २०२४ च्या पीक विम्याचे वाटपही लवकरात लवकर करण्याची मागणी अंतापूरकर यांनी सरकारकडे केली.

आमदार अंतापूरकर यांनी यावेळी बँक अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारावरही तीव्र नाराजी व्यक्त केली. अनेक शेतकरी विविध कारणांनी पीक कर्जापासून वंचित राहत असल्याच्या तक्रारी येत आहेत. यावर शासनाने तातडीने लक्ष घालून बँकांना लेखी सूचना देऊन शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपाची सक्ती करावी, अशी आग्रही मागणी त्यांनी विधानसभेत केली.

शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सध्या नाजूक असून, पीक विमा आणि वेळेवर मिळणारे पीक कर्ज हे त्यांच्यासाठी जीवनवाहिनी आहे.त्यासाठी शासनाने याकडे विशेष लक्ष द्यावे अशी मागणी आ.जितेश अंतापूरकरांनी विधानसभेत केले.

# प्रणेता देसले यांच्या छत्रपती संभाजी महाराज ग्राहक जनजागृती मोहिमेचा लवकरच शुभारंभ
## अकरा हजार जनजागृती पत्रके वाटपाचा मानस

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------------

ग्राहक जनजागृती कार्यकर्ते तथा साक्री तालुका ग्राहक पंचायतीचे फाऊंडर सदस्य प्रणेता देसले यांच्या वतीने भव्य छत्रपती संभाजी महाराज ग्राहक जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे लवकरच शुभारंभ करण्यात येणार आहे ही ग्राहक जनजागृती मोहीम ग्राहक चळवळीला बळकट करण्याचे काम करेल असे मत प्रणेता देसले यांनी व्यक्त केले आहे. या मोहिमेच्या अंतर्गत आकरा हजार जनजागृती पत्रके वाटप करण्यात येणार आहेत. सामाजिक कार्यकर्ते प्रणेता देसले यांनी आजपर्यंत आदिवासी व ग्रामिण भागामध्ये अनेक विधायक उपक्रम राबवीलेले आहेत. सदर उपक्रमांमुळे ग्रामिण भागातील युवक, युवती, शेतकरी बंधू, व्यवसायीक बंधु तसेच परिसरातील नागरीकांनसाठी मोठ्या प्रमाणात समाज प्रबोधनासाठी उपयोगी पडलेले आहेत. प्रणेता देसले यांनी गेल्या अनेक वर्षापासुन पर्यावरण संतुलन, वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन , वनमोहोत्स्व , वन्यप्राणी सप्ताह, वृक्ष दिंडी, पाणी आडवा पाणी जिरवा, उपक्रम, जलसंवर्धनासाठी वनराई बंधारे बांधाण्या साठी जनजागृतीपर उपक्रम तसेच अंधश्रध्दा निमुर्लन, बाल मजूरी विरोधी जनजागृती,




कृष्ट्ररोग जनजागृती, एड्स जनजागृती, दिव्यांग कल्याण जनजागृती, व्यसनमुक्ती अभियान, प्रौढ शिक्षण जनजागृती, आपत्ती व्यवस्थापन जनजागृती, ग्राहक जनजागृती , फटाके मुक्त दिवाळी, उर्जा संवर्धन व व्यवस्थापन जनजागृती, तंटा मुक्ती गाव मोहिम जनजागृती, स्वच्छता अभियान, बेटी बचाव बेटी पढाव अभियान, युवक कल्याण, महिला सक्षमीकरण, पर्यावरणपूरक होळी, रस्ता सुरक्षा अभियान, पुस्तक वाटप अभियान, डिजिटल इंडिया जनजागृती, बालकांची काळजी व सुरक्षा जनजागृती, कुपोषण जनजागृती, साक्षरता अभियान इत्यादी नाविन्यपूर्ण उपक्रम गेल्या २० वर्षापासुन ग्रामिण भागामध्ये राबवीत आहेत. प्रणेता देसले यांना त्यांच्या या कार्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या वतीने, विविध नामांकित सामाजिक संस्थांच्या वतीने अनेक पुरस्कार व सन्मानपत्र मिळालेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख थांबावा यासाठी प्रणेता देसले यांच्या वतीने गेल्या दोन ते तीन वर्षापासुन महाराष्ट्रभर शिवाजी पुतळा नव्हे शिवतिर्थ म्हणूया हा उल्लेखनीय उपक्रम राबवीण्यात येत आहे. या उपक्रमात महाराष्ट्रातील आमदार, खासदार, अभिनेते, शेतकरी, व्यवसायईक, युवावर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ मंडळी सहभागी झालेली आहेत व भरभरुन प्रतिसाद दिलेला आहे. छत्रपती संभाजीराजे भोसले, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार सीमा हिरे, आमदार देवयानी फरांदे, अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी प्रणेता देसलेंच्या उपक्रमाचे कौतुक केलेले आहे. तसेच प्रणेता देसले यांना मलेशियाच्या वाबा या संस्थेतर्फे देखील सन्मानित करण्यात आले आहे. तसेच प्रणेता देसले यांनी मुक्तपत्रकारितेच्या माध्यमातून नामांकित वृत्तपत्रातून लेख प्रकाशित केले आहेत. समाजसेवक प्रणेता देसले हे जवळपास दोन दशकांपासून सामाजिक कार्यात सहभागी आहेत.


अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७


# बोगस बियाण्यांमुळे शेतकरी हवालदिल: अंतापूरकरांची विधानसभेत आक्रमक
## शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदतीची केली मागणी

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-----------------------

देगलूर आणि बिलोली तालुक्यातील शेतकरी बोगस सोयाबीन बियाण्यांमुळे मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. या गंभीर फसवणुकीमुळे शेतकरी हवालदिल झाले असून, त्यांना दुबार पेरणीचा नाहक त्रास आणि मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. आमदार जितेश अंतापूरकर यांनी पावसाळी अधिवेशनात औचित्याच्या मुद्याद्वारे हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न सभागृहात मांडत, शासनाने तात्काळ याकडे लक्ष देऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्याची जोरदार मागणी केली आहे.

आमदार अंतापूरकर यांनी सभागृहात माहिती दिली की, देगलूर तालुक्यातून १११ तर बिलोली तालुक्यातून १५ अशा एकूण १२६ अधिकृत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने "किमया" कंपनीचे KDS ७५३ तसेच "उत्तम" आणि "परम" या कंपन्यांच्या बियाण्यांबाबत तक्रारी दाखल झाल्या आहेत. या बोगस बियाण्यांमुळे शेतात पीक उगवलेच नाही, परिणामी शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. अंतापूरकर यांनी शासनाकडे आग्रहाने मागणी करत ज्या शेतकऱ्यांचे बोगस बियाण्यांमुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे, त्यांना सरकारमार्फत त्वरित आर्थिक मदत मंजूर करण्यात यावी. या फसवणुकीला जबाबदार असलेल्या बियाणे कंपन्यांवर तातडीने आणि कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी बियाण्यांचे प्रमाणपत्र, तपासणी आणि वितरण व्यवस्थेवर कठोर नियंत्रण ठेवण्यात यावे. शेतकऱ्यांच्या जीवनाशी थेट संबंधित असलेल्या या गंभीर प्रकाराकडे शासनाने तात्काळ लक्ष देणे आवश्यक असल्याचे आमदार अंतापूरकर यांनी अधोरेखित केले.

# "महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांनी मला लाथा-बुक्क्यांनी मारले!"
## माजी सैनिक चंदू चव्हाण यांचा महानगरपालिकेवर गंभीर आरोप
### न्याय मागायला गेलो आणि वागणूक मिळाली दहशतवाद्यासारखी चव्हाण यांचा संतप्त सवाल

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

"मी पाकिस्तानात जाऊन देशासाठी दहशतवाद्यांशी लढलो… पण आज स्वतःच्या हक्कासाठी महानगरपालिकेत गेलो, तेव्हा मला लाथा-बुक्क्यांनी मारहाण करण्यात आली!" हा गंभीर आरोप करताना माजी सैनिक चंदू चव्हाण यांचा आवाज



भावनांनी भरलेला होता.

चंदू चव्हाण म्हणाले, "मी दोन वर्षांपासून माझ्या लहान अडीच वर्षांच्या मुलासह न्यायासाठी दरवाजा ठोठावतोय. आजही महानगरपालिकेत गेलेलो असताना कर्मचाऱ्यांनी मला तुच्छतेने हाकलले. मी विरोध केला, तेव्हा चार कर्मचाऱ्यांनी मला धरून जबरदस्तीने मारहाण केली. ही लोकशाही आहे का?" चव्हाण यांचा आरोप आहे की, महानगरपालिकेतील काही कर्मचाऱ्यांचा वागणूकिचा पिंडच अहंकारी आणि नागरिकद्वेषी झाला आहे. "एका देशासाठी लढलेल्या सैनिकाला जर भीक मागावी लागते, न्याय मागितल्यावर मारहाण होते, तर सामान्य माणसाचं काय?" – असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

या प्रकारानंतर परिसरात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या असून संबंधित कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करून त्वरित निलंबनाची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# नूतन मराठा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय छडवेल कोर्डे येथे निवडणुकांचे वारे !

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------------

लोकशाही देशातील निवडणूक प्रक्रिया विद्यार्थ्यांना शालेय वयातच समजावी. यासाठी नूतन मराठा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये निवडणूक प्रक्रिया नुकतीच पार पडली. उमेदवारांचे अर्ज मागविण्यापासून निकाल लागेपर्यंतच्या सर्व बाबी विद्यार्थ्यांना या माध्यमातून प्रत्यक्ष अनुभवता आल्या आहेत. साक्री तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित नूतन मराठा विद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ साठी शालेय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री पदासाठी निवडणुका पार पडल्या, देशातील समृद्ध गौरवशाली लोकशाही विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामपंचायत निवडणुकां विषयी विद्यार्थी ऐकून असला तरी हा प्रत्यक्ष अनुभव त्यांना घेता यावा यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. आठवडा भर वर्गा वर्गामधून प्रचार करून आपण शाळेसाठी काय काम करू इच्छितो हे विद्यार्थ्यांनी सांगितले मा. प्राचार्य संजयकुमार पाटील, व पर्यवेक्षक मा.रघुनाथ



नागरे यांनी महाविद्यालयीन व शालेय स्तरावरील निवडणुकांचे महत्त्व विद्यार्थ्यांना आपल्या मनोगतातून पटवून दिले आज आपल्या देशातील अनेक नेते अत्यंत कमी वयात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झालेत त्यात आदराने नाव घेतलं जाते ते मा. यशवंतराव चव्हाण ,मा.शरदचंद्रजी पवार, मा. विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, मा. उद्धव ठाकरे ,मा. विलासराव देशमुख इत्यादी नेत्यांचे आदर्श आपणही जरूर लक्षात ठेवावे. यावर्षी मंत्रिमंडळाची निवडणूक *बिनविरोध* झाली हे खास *वैशिष्ट्यपूर्ण* ठरले. या निवडणुकीत इयत्ता पाचवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या निवडणुकीसाठी उपक्रमशील शिक्षक व कमिटी प्रमुख के.के. गांगुर्डे, विद्यालय प्रतिनिधी हरकलाल पवार, ए के पाडवी, एन के बेडसे, जी एम बागुल, अशोक सूर्यवंशी , सर्व वर्गशिक्षक, शिक्षकेतर प्रतिनिधी सिद्धार्थ मोहिते यांनी कामकाज पाहिले. सर्व मंत्रिमंडळातील सदस्यांनी विधिमंडळातील सदस्यांप्रमाणे शपथ घेतली. सर्व नवनिर्वाचित मंत्रिमंडळातील विद्यालयाचे मुख्यमंत्री खुशी बेडसे, उपमुख्यमंत्री पार्वती सावळे,प्रार्थना मंत्री चॉनी पाटील ,अभ्यास मंत्री सुवर्णा वसावे, वृक्ष संवर्धन मंत्री नंदिनी जगताप, आरोग्य मंत्री तेजल वेंडाईत ,सहल मंत्री हर्षल पाटील, क्रीडामंत्री वृषाली पवार, सांस्कृतिक मंत्री शुभांगी गवळी ,विद्यार्थ्यांनी प्रतिनिधी रसिका साळुंखे ,अर्थमंत्री तेजल साळुंखे, संसदीय मंडळ उपाध्यक्ष भावेश पिंपळे यांचे संस्थेचे अध्यक्ष मा. दादासाहेब पराग बेडसे, संस्थेचे सेक्रेटरी मा. भैय्यासाहेब अनिल सोनवणे, संस्थेचे विश्वस्त मा.एडवोकेट भैय्यासाहेब गजेंद्र भोसले, मा.आबासाहेब संजय पाटील, मा. भाऊसाहेब दीपक अहिरराव, मा.अण्णासाहेब उत्तमराव बोरसे व व्यवस्थापक मंडळ सदस्य, विद्यालयाचे प्राचार्य संजयकुमार पाटील, पर्यवेक्षक रघुनाथ नागरे व सर्व वर्ग शिक्षकांनी अभिनंदन केले आहे .

# मल्हारवाडी येथे खरीप हंगाम सर्वसाधारण शेतीशाळा वर्ग संपन्न

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------------

नांदगाव शहराजवळील मल्हारवाडी येथे महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांचे मार्फत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पोकरा टप्पा २ अंतर्गत मका पिक शेतीशाळा वर्ग आयोजित करण्यात आला..सदर शेतीशाळेस उपस्थित शेतकऱ्यांचे स्वागत करण्यात आले .सदर शेतीशाळेस उपस्थित जेष्ट प्रगतिशिल शेतकरी वाल्मीक काकळीज यांचेसह' भाऊसाहेब



काकळीज, 'समाधान काकळीज ' रामचंद्र खैरनार, 'संजय महाजन, ' पुंडलिक काकळीज,' गणेश काकळीज अशोक महाजन, उमेश तुसे नानासाहेब काकळीज व इतर सर्व शेतकऱ्यांना मका पिक खत व्यवस्थापन, एकात्मिक कीड व्यवस्थापन, निविष्ठांचा वाजवी वापर तसेच मका पिकावरील किड व रोग, मित्र कीटक ओळख, दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत, वापर व उपयोग याची माहिती देण्यात आली शेतीशाळेची सांगता शेतकऱ्यांना नाश्ता देऊन करण्यात आली. सहाय्यक कृषि अधिकारी के.आर.कडू बी.वी.गवळी 'डी.डी.ठाकरे सर, एस.एम.भिवसन ' एस.वाय.पवार ' ए. ए.पवार 'एल.एस.गायकवाड ऋषभ वडीतके यांच्या सहकार्यातून शेतीशाळा यशस्वीरित्या पार पडली.

# डॉ. डी. एस. आहेर प्राथमिक विद्यालयाच्या वतीने पांडवलेणी परिसरात हरितकुंभ वृक्षारोपण उपक्रम

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

पर्यावरण रक्षण आणि विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेमाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने अंबिका मित्र मंडळ संचलित डॉ. डी. एस. आहेर प्राथमिक विद्यालय, दौलत नगर सिडको यांच्या वतीने हरितकुंभ संकल्पनेअंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक आणि निसर्गरम्य पांडवलेणी परिसरात जाऊन वृक्षारोपण केले.

या उपक्रमात विद्यार्थ्यांसह शिक्षकवर्ग, पालक व स्थानिक नागरिकांचा मोठा सहभाग होता. फळझाडे, औषधी वनस्पती व छायादार झाडांची लागवड करत पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.










कार्यक्रमाचे नेतृत्व मुख्याध्यापिका विद्या पाटील यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सांगितले की, “निसर्ग आपला गुरु आहे. झाडे लावणं म्हणजे भविष्यासाठी शुद्ध श्वास निर्माण करणं आहे.”

या उपक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब विनायक पाटील, संस्थेचे सचिव अमोल पाटील व संस्थेचे प्रशासन अधिकारी आर. सी. सोनवणे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला.

कार्यक्रमात पुढील शिक्षकांनी सक्रिय सहभाग घेतला – वैशाली भामरे, संदीप अहिरे, सविता वाघ, वर्षा पालवे, पंकज सोनवणे, पूनम पाटील, भाग्यश्री पाटील, अन्वरशाह फकीर, अश्विनी गायकवाड, संदीप दांडगे, माधवी पाटील, धनश्री विसपुते, वृषाली महाजन.

विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणासोबत पर्यावरण गीतं, घोषवाक्ये, आणि माहितीपर सादरीकरणाद्वारे जनजागृतीही केली.

# हरितकुंभ योजनेअंतर्गत ग्रामपंचायत मल्हारवाडी येथे वृक्षारोपण

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

हरितकुंभ योजने अंतर्गत ग्रामपंचपत मल्हारवाडी येथे सरपंच अश्विनी मुकुंदा खैरनार यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत आवारात



झाडे लावण्यात आली. यावेळी सरपंच अश्विनी खैरणार यांनी वृक्षाचे महत्व सांगितले तसेच वृक्षापासून असलेले फायदे सांगितले यावेळी उपसरपंच दिपक खैरनार, वाल्मिक काकळीज, तंटामुक्ती अध्यक्ष मुकुंद खैरनार, प्रकल्प पाटील भुषण धुत ' दिपक कासलीवाल गोकुळ खैरणार ' कृष्णा बावणे तसेच कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# मोफत कृत्रिम अवयव मोजमाप नोंदणी शिबिराचे सप्टेंबरमध्ये आयोजन
## दिव्यांग व वयोश्री ज्येष्ठ नागरिकांना मिळणार साधनांचा लाभ

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-------------------------

सामाजिक न्याय एवम अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार यांच्या एडीआयपी व वयोश्री योजनेअंतर्गत भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (अलिम्को) कानपूर, जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात दिव्यांगाना कृत्रिम अवयव व सहाय्यभुत साधने मोजमाप नोंदणी शिबिराचे आयोजन नांदेड जिल्ह्यातील उपविभागीय कार्यालयाच्या ठिकाणी करण्यात येणार आहे. याबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली.




यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार व भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (अलिम्को) कानपूर संस्थेचे सदस्य के.डी गोटे तसेच सर्व संबंधित विभागाचे विभागप्रमुख आदीची उपस्थिती होती. तर जिल्ह्यातील तहसिलदार, दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे प्रकल्प संचालक विजय कानेकर, गटविकास अधिकारी यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थिती होती.

दिव्यांगाना कृत्रिम अवयव व सहाय्यभुत साधने व मोजमाप नोंदणी शिबिर जिल्ह्यातील उपविभागीय कार्यालयाच्या ठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे. या शिबिराच्या दृष्टीने कराव्या लागणाऱ्या सर्व बाबीचा पूर्व नियोजन आढावा या बैठकीत घेण्यात आला. तसेच ग्रामपंचायत, नगरपरिषद, महापालिका यांनी या शिबिराच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीचे नियोजनही यावेळी करण्यात आले. शिबिराच्या ठिकाणी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून देण्यात येणाऱ्या दिव्यांगाना युडीआयडी कार्ड, तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी शिबिराच्या ठिकाणी दिव्यांगाचे, जेष्ठ नागरिक व महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर, महसूल विभागाकडून उत्पन्नाचे प्रमाणपत्र मिळावे यासाठी शिबिरे आयोजित करण्याच्या सूचना खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी दिल्या. दिव्यांग व जेष्ठ नागरिकांनी या शिबिरात सहभागासाठी त्यांचे आधारकार्ड, दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र (युडीआयडी), उत्पन्नाचा दाखला आदी आवश्यक कागदपत्र सोबत आणण्याचे आवाहनही त्यांनी केले.

दिव्यांगाना या शिबिरात देण्यात येणाऱ्या साधनांचा तपशील सर्व प्रकारचे कृत्रिम अवयव तसेच सहाय्यभूत साधनांमध्ये अस्थिव्यंग प्रवर्गातील वयोगट ५ ते १०० यामधील दिव्यांगाना तीनचाकी सायकल, व्हीलचेअर, कुबडी, सर्व प्रकारच्या काठ्या, रोलेटर, सीपीचेअर हे साहित्य देण्यात येणार. अस्थिव्यंग प्रवर्ग वयोगट १८ ते ४० मोटराइज ट्रायसायकल यासाठी पात्रता ८० टक्के दिव्यंगत्व असलेले प्रमाणपत्र, १२ हजार रुपये स्थानिक सहभाग राहील. मतीमंद प्रवर्गासाठी व्हिलचेअर, एमआर किट (१४ वर्षापर्यत), सीपीचेअर (१२ वर्षापर्यत) हे साहित्य मिळेल. कर्णबधीर प्रवर्गासाठी वय ३ ते १०० या वयोगटासाठी श्रावणयंत्र देण्यात येइल. अंध प्रवर्गातील वयोगट ५ ते १५ यामध्ये ७५ टक्के वरील प्रमाणपत्रधारक यांना स्मार्ट केन, ब्रेल किट, डेसी प्लेअर तसेच अंध प्रवर्गातील वयोगट १५ ते ४० यामध्ये स्मार्ट फोन, स्मार्ट केन ७५ टक्के वरील प्रमाणपत्रधारक यांना देण्यात येणार आहे. या शिबिरात सहभागासाठी दिव्यांगानी लागणारी आवश्यक कागदपत्रे पुढीलप्रमाणे आहेत. दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्राची सत्यप्रत, आधारकार्ड, उत्पन्नाचे प्रमाणपत्र किंवा रेशनकार्ड सत्यप्रत, पासपोर्ट साईज फोटो, शालेयअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी उत्पन्नाच्या प्रमाणपत्राची गरज भासणार नाही. त्याऐवजी शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र आवश्यक राहील.

या शिबिरात वयोश्री योजनेअंतर्गत जेष्ठ नागरिकांना सहाय्यभुत साधनांमध्ये चालण्याची काठी, वॉकर, क्रचेस, ट्रायपॉड, क्वाडपॉड, श्रावणयंत्र, व्हिलचेअर, कृत्रिम दाताची कवळी, चष्मे यांचा समावेश आहे. यासाठी बीपीएल कार्ड, आधारकार्ड, पिवळे राशनकार्ड आवश्यक आहे अशी माहिती जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांनी दिली. यावेळी भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (अलिम्को) कानपूर संस्थेचे सदस्य के.डी गोटे यांनी शिबिराबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

# मिल परिसरातील निखील पाटील खून प्रकरणी मयूर शार्दूलसह तिघा भावांना अजन्म कारावास
## मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधिश माधुरी आनंद यांचा निकाल

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

धुळे येथे किरकोळ कारणावरून वाद घालून मिल परिसरातील युवकाचा निर्घृण खून केल्याप्रकरणी मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश माधुरी आनंद यांनी तिघा भावांना आजन्म करावास व प्रत्येकी दहा हजार रुपये दंड भरण्याची शिक्षा सुनावली.सरकार पक्षातर्फे परिस्थितीजन्य पुराव्यासह केलेला युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला.

न्यायालयाने आज दिलेल्या या निकालाने प्रामुख्याने मिल परिसर आणि संपूर्ण जिल्ह्यातल्या गुन्हेगारी क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या खटल्याची थोडक्यात माहिती अशी-किरकोळ करणावरून वाद घालून मयूर मच्छिन्द्र शार्दुल (वय ३५ वर्षे), मनोज मच्छिन्द्र शार्दूल (वय ३०वर्षे) व आणि मुकेश मच्छिन्द्र शार्दूल (वय २२ वर्षे) सर्व रा. विद्युत नगर, सुरतवाला बिल्डिंग जवळ, मिल परिसर धुळे यांनी निखिल साहेबराव पाटील (वय २० वर्षे) रा.विद्युत नगर सुरतवाला बिल्डिंग जवळ,धुळे याच्यावर लाठ्याकाठ्यांनी प्राणघातक हल्ला चढविला.४ फेब्रुवारी २०२२ रोजी सायंकाळी सव्वासात वाजेला शासकीय दूध डेअरी रस्त्यावरील स्वराज जिम जवळ झालेल्या या तीव्र हल्ल्यात निखिल पाटील हा रक्तबंबाळ झाला आणि गंभीर जखमी झाल्याने त्याचा मृत्यू ओढवला.

याप्रकरणी मृत निखिलचा भाऊ दीपक साहेबराव पाटील याने शहर पोलिस ठाण्यात फिर्याद नोंदविली. घरगुती कारणावरून वाद घालून मयूर मनोज आणि मुकेश शार्दूल या तीनही भावांनी निखिल पाटील याच्यावर हल्ला चढवीला या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याने निखिलचा मृत्यू झाला असा आरोप या फिर्यादितून करण्यात आला होता. या फिर्यादीवरून पोलिसांनी शार्दूल बंधूविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक दादासाहेब पाटील यांनी या खून प्रकरणाचा तपास केला होता.यानंतर त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश माधुरी आनंद यांच्यासमोर या खटल्याचे कामकाज झाले.न्यायालयाने उभय पक्षाचा युक्तिवाद नोंदविताना परिस्थितीजन्य पुरावे आणि १२ साक्षीदार तपासले.दरम्यान, जिल्हा सरकारी वकील देवेंद्रसिंह तवर यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त सरकारी अभियोक्ता संजय मुरक्या यांनी आपल्या प्रभावी युक्तिवादातून हा भीषन हल्याचा घटनाक्रम,मृत निखिल पाटीलच्या शव विच्छेदनातून स्पष्ट झालेल्या त्याच्या अंगावरील खोलवरच्या जखमा आणि रक्तस्राव न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला.हा युक्तिवाद आणि परिस्थितीजन्य पुरावा ग्राह्य धरला.पैरवी अधिकारी विजय जडे व पोलीस उपनिरीक्षक सुमित चव्हाण यांनी या खटल्यात सरकार पक्षाला सहकार्य केले.

मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश माधुरी आनंद यांनी मयूर शार्दूल,मनोज शार्दूल व मुकेश शार्दूल या तीनही भावांना प्रत्येकी दहा हजार रुपये दंड आणि आजन्म कारावास अशी शिक्षा सुनावली.दंड न भरल्यास प्रत्येकी एक महिना सश्रम कारवास अशी शिक्षा भोगावी लागेल असेही न्यायालयाने आपल्या निकालपत्रात म्हटले आहे.

> **या खटल्यात मृत निखिल पाटील याचा फिर्यादी भाऊ दीपक पाटील आणि आई वंदना साहेबराव पाटील तसेच मामा योगेश संतोष पाटील आणि अनिल किशोर पाटील हे चौघेही फितूर झाले. या चौघांनी सरकार पक्षाला अपेक्षित सहकार्य केले नाही.**
> **संजय मुरक्या,**
> **अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, धुळे.**

# पिंपळनेर नगरपरिषदेच्या बोधचिन्हात आदिवासी संस्कृती संबंधित समावेश करावा
## आदिवासी समाज बांधवांच्या वतीने नगरपरिषदेला दिले निवेदन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

पिंपळनेर शहर हे आदिवासी बहुल भागाने वेढलेले असून अनुसूचित क्षेत्रात येत असल्याने पूर्वी पेसा ग्रामपंचायत होती. नव्यानेच नगरपरिषद स्थापन झाल्याने १०/०७/२०२५ रोजी पिंपळनेर नगरपरिषदेचे बोधचिन्ह (Logo) निश्चित करण्याकरिता हरकत मागविण्यात आले होते. यास पिंपळनेर शहरातील आदिवासी समाज बांधवांच्या वतीने आदिवासी



संस्कृती संबंधित घटकाचा बोधचिन्हात (Logo) मध्ये समाविष्ट करण्यात यावा यासाठी मा.मुख्याधिकारी नगरपरिषद पिंपळनेर यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी, मा.अनिल दादा गायकवाड, भिकन दादा पवार, प्रेमचंद सोनवणे, रविंद्र अहिरे, तानाजी बहिरम, अजय राऊत, जयस संघटनेचे कुंदन गांगुर्डे, अजय पवार, समिर गायकवाड, स्वप्निल राऊत, किशोर ठाकरे,रवि राऊत, राहुल मोहीते, कौशल उंबरे, प्रदिप पवार इ. समवेत जय आदिवासी युवा शक्ती (JAYS) संघठन पिंपळनेर शहर च्या वतीने हरकत नोंदवत निवेदन देण्यात आले.

# सक्षम तू या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कायदे विषयक ज्ञान प्राप्त होईल - जिल्हाध्यक्ष संजीवनी गांगुर्डे

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्रीअजित दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त * सक्षम तू* हा उपक्रम राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा मा.रुपाली ताई चाकणकर यांच्या आदेशान्वये संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे. धुळे जिल्हा निरीक्षक मेघाताई दराडे व जिल्हाअध्यक्ष अण्णासाहेब सुरेशजी सोनवणे यांच्या मार्गदर्शनाने धुळे जिल्ह्यात राष्ट्रवादी महिला कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष सौ संजीवनी मधुकरराव गांगुर्डे यांनी साक्री येथील न्यू इंग्लिश स्कूल येथे



पोलीस विभागामार्फत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर कार्यक्रम घेतला. शालेय जीवनातील प्रत्येक टप्पा अतिशय महत्त्वाचा व प्रत्येक शिकवण मनावर कोरणारी असते. या दिवसांमध्ये शिक्षण घेत असताना मिळालेले बाह्य ज्ञान, सामाजिक भान, एक प्रगल्भ व सुजन नागरिक घडवतो, त्यामुळे राष्ट्रवादी महिला कॉंग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस विभागाशी संपर्क साधून शाळेत सक्षम तू अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कायदेविषयक पोक्सो , सायबर गुन्हेगारी संदर्भा तसेच टोल फ्री नंबर माहिती, आत्म संरक्षणासंदर्भात पोलीस समुपदेशन, बीट मार्शल व दामिनी पथक यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधून जनजागृती मोहीम राबवित आहेत. त्या संदर्भात आज दिनांक १५/७/२०२५ वार मंगळवार रोजी साक्री येथील न्यू इंग्लिश स्कूल येथे पोलीस विभागामार्फत कॉन्स्टेबल श्रीमती रोहिणी सूर्यवंशी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना कायदेविषयक, पोक्सो ,सायबर गुन्हेगारी संदर्भात माहिती दिली यावेळी कार्यक्रमाच्या आयोजक जिल्हाअध्यक्ष सौ. संजीवनी गांगुर्डे उपस्थित होत्या तसेच न्यू इंग्लिश स्कूलचे प्राचार्य प्रमोद एस बेडसे सर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला यावेळी तालुकाध्यक्ष सै.वर्षा भामरे , शितल बोरसे, माजी मुख्याध्यापक श्री मधुकरराव गांगुर्डे सर , श्रीमती सुनंदा शिंगाने ,श्रीमती मंजुषा ठाकरे, मीना सूर्यवंशी, वनमाला साळुंखे तसेच श्री सुरेश मोहने सर यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. यावेळी सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी हजर होते.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

## स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!



महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!
SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

### प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

**8446673677 / 8010232449**